स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वजनिक पाणी पुरवठा आणि पथदिपांची म.रा.वि.मंडळाची वीज बील थकबाकी वसुलीबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.बीएलए-२००३/प्र.क्र.१२११/ऊर्जा-४
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक:-२४ जून,२००३.

वाचा:-नगर विकास विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:संकिर्ण-१०/२००२/प्र.क्र.८६/नवि-२७, दि.१४मे,२००३.

**प्रस्तावना:-**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाकडून तसेच शासन अंगीकृत विविध उपक्रमांकडून सार्वजनिक दिवाबत्ती,पाणी पुरवठा व इतर बाबींबाबत जनतेशी निगडीत असलेल्या सेवा पुरविल्या जातात.त्यांचेकडून देण्यात येणा-या सेवांपोटी निर्माण झालेली वीज मंडळाची विद्युत देयके विहीत मुदतीत मंडळास अदा न केल्यामुळे त्यांचेकडे मोठ्या प्रमाणावर वीजबिलाची थकबाकी वाढत चाललेली आहे.मोठ्या प्रमाणावरील मंडळाच्या वीज बीलाच्या थकबाकीमुळे मंडळास रोकड सुलभतेच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत असून परिणामतः राज्यातील विद्युत पुरवठ्याची स्थिती चांगली राखण्यास मंडळ असमर्थ ठरत आहे. मंडळाची स्थानिक संस्थाकडील थकबाकी कमी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

१. राज्यातील महानगरपालिका आणि नगरपालिका सार्वजनिक संस्था यांचेकडील पाणी पुरवठा आणि पथदिपांची नियमित वीज देयके व थकबाकी भरण्यासंदर्भाने नगर विकास विभागाने निर्गमित केलेल्या उक्त दि. १४मे,२००३ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (मजीप्रा ) ब-याचशा योजना स्थानिक संस्थाकडे विशेषत्वाने ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करुनही पुर्वीच्या थकबाकीच्यां कारणास्तव त्या योजनांची वीज जोडणी त्या त्या संस्थाच्या नावे झालेली नाही. त्यामुळे अशा योजनांचे वीज बिल मजीप्रा किंवा संबंधित संस्था यापैकी कोणीच भरीत नाहीत. अशा सर्व प्रकरणी म.रा.वि.मंडळाने त्या योजनांच्या वीज जोडण्या त्वरित संबंधित स्थानिक संस्थाच्या नावे कराव्यात. मजीप्राच्या नांवे दर्शविलेल्या थकबाकीसंदर्भात मजीप्राने योजना हस्तांतरणापूर्वीची व हस्तांतरणानंतरची थकबाकीची रक्कम म.रा.वि.मंडळाच्या सहाय्याने वेगवेगळी करण्याची कार्यवाही करावी. ही कार्यवाही संबंधित जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे मदतीने मजीप्राचे अधिक्षक अभियंता यांनी

ऑगस्ट,२००३ अखेरपर्यंत पूर्ण करावी. अशाच प्रकारची कार्यवाही मजिप्रा संबंधित अधिक्षक अभियंता यांनी नागरी पाणी पुरवठा योजनांसंदर्भात,जेथे लागू असेल तेथे करावी. याप्रमाणे वीज बिल थकबाकीची विभागणी न झाल्यास ती रक्कम भरण्याची जबाबदारी मजिप्रची राहील.

२.१ याप्रमाणे निश्चित केलेल्या थकबाकीचे सुलभ हप्ते निश्चित करण्यासाठी संबंधित स्थानिक संस्था किंवा मजीप्रा म.रा.वि.मंडळाकडे संपर्क साधतील. थकबाकीच्या हप्त्याची रक्कम म.रा.वि.मंडळाकडे अदा करण्यासंदर्भाने कुचराई झाली तर म.रा.वि. मंडळ अशा थकबाकीबाबत दर ३ महिन्यांनी संबंधित जिल्हापरिषद तसेच ग्राम विकास विभाग आणि पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे संदर्भ करेल, जेणेकरुन त्या स्थानिक संस्थेला द्यावयाच्या अनुदानातून वीज बिल थकबाकीच्या रकमेची कपात करता येईल. तद्नंतरही वीजबिलाच्या रकमेचा भरणा विद्युत मंडळाकडे झाला नाही तर मंडळाकडून विद्युत पुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात यावी. जिल्हापरिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी ग्रामपंचायतींची चालू वीज देयके भरण्याचे क्षमता तपासून त्यांना यासंदर्भाने आवश्यक ते दर वाढविणे, खर्चात कपात करणे, इ. उपाय योजण्याबाबत निदेश द्यावेत, जेणेकरुन वीज बिलाची देयके अदा करण्यास त्या सक्षम होतील.

२.२ एकदा वीज बिलांच्या थकबाकीचा मेळ घालून त्यासंदर्भातील हप्ते निश्चित झाल्यावर महानगरपालिका/नगरपालिका/ ग्रामपंचायतीसारख्या स्थानिक संस्था त्यांची चालू वीज देयके तसेच थकबाकीचे हप्ते नियमितपणे भरण्याची काळजी घेतील.अन्यथा त्यांचा वीज पुरवठा म.रा.वि.मंडळाव्दारे खंडित केला जाईल जिल्हाधिकारी / जिल्हा पोलिस अधिक्षक / विभागीय आयुक्त /जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण देऊन विद्युत पुरवठा खंडित न करण्याची कार्यवाही करण्याबाबत मंडळावर दबाव आणू नये. अशा प्रकारचे कोणतेही आदेश मंडळावर बंधनकारक असणार नाहीत. मंडळाने असे आदेश शासनाच्या निदर्शनास आणावे. अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब करावयाची झाल्यास विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांनी ऊर्जा विभागाचे आदेश घ्यावेत.

३. पथदिपांचे वीज बिल भरण्यासाठी ग्रामपंचायतीना १०० टक्के अनुदान देण्यात येते.सद्यस्थितीत ग्राम विकास विभागाकडून जिल्हापरिषदांमार्फत संबंधित ग्रामपंचायतीना हे अनुदान देण्यात येते. त्यामुळे ग्रामपंचायतीकडील पथदिपांची वीज बिल थकबाकी मंडळाकडे अदा झाली नाही तर अशा थकबाकीचा वर्षाच्या शेवटी मंडळाकडून शासनास येणे असलेल्या रकमेशी मेळ घालून पुस्तकी समायोजनाने सदरची रक्कम मंडळास अदा करण्यात यावी.समायोजनानंतरही संपूर्ण थकबाकीची वसुली होत नसेल तर संबंधितांचा वीज पुरवठा म.रा.वि.मंडळाव्दारे खंडित करण्यात येईल.

एच-357(ए)(800-6-03)1अ
4121(03)GR1

८. शासनाच्या विविध कार्यालयांद्वारे मंडळास देय असणारी वीज देयकाची रक्कम संबंधित विभागाकडून थेट मंडळाकडे अदा करण्यासंदर्भाने कार्यवाही करण्याचा प्रस्ताव या विभागाच्या विचाराधीन होता. तथापि अशा पध्दतीने क्षेत्रीय कार्यालयांची वीज बिले अदा करण्यात आली तर त्यांच्याकडून वीज वापर काटकसरीने न होता तो अनिर्बंध होऊन वीज बिलांची रक्कम मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता विचारात घेऊन मंडळाची वीज देयके नियमितपणे भरण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांवर सोपविण्यात येत आहे. कार्यालय प्रमुखांनी उपलब्ध अनुदान प्राधान्याने वीज बिल भागविण्यासाठी वापरावे. यापूर्वीची म्हणजेच दि. ३१.३.२००३ पर्यंतची सुमारे ८२.१२ कोटी इतकी शासकीय कार्यालयांची वीज बिलाची थकबाकी,थकबाकीच्या रकमेचा मेळ शासनाचा संबंधित विभाग व म.रा.वि.मंडळ यांनी घातल्यावर एकदाच सदर रक्कम मंडळास पुस्तकी समायोजनाने अदा करण्यात येईल.

८.१ रुग्णालय आणि अग्नीशमन केंद्र या अत्यावश्यक सेवा वगळून इतरांचा वीज पुरवठा थकबाकीस्तव खंडित करण्याची मुभा विहीत कार्यपध्दतीचे पालन केल्यावर मंडळास राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वी.वी.शर्मा )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:-
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/जिल्हा पोलिस अधिक्षक
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
आयुक्त,सर्व महानगरपालिका
मुख्याधिकारी,सर्व नगरपरिषदा
अध्यक्ष,म.रा.वि.मंडळ,प्रकाशगड,वांद्रे(पूर्व),मुंबई ४०००५१
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,४था मजला,एक्सप्रेस टावर्स,नरीमन पॉईंट,मुंबई.
सहसचिव (पापु-३३)पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई ४०००३२.३
उपसचिव,(पंरा-४)ग्राम विकास विभाग.मंत्रालय,मुंबई ४०००३२.
उपसचिव,(नवि-२७)नगर विकास विभाग.मंत्रालय,मुंबई ४०००३२.